**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**अकोला, कृषी हवामान सल्ला** **मंगळवार दिनांक – ३० जून २०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक ०१ ते ०५ जुलै २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ |
| पाऊस (मिमी) | ४ | ८ | १० | ५ | १ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३४ | ३५ | ३३ | ३२ | ३२ |
| किमान तापमान (अं.से.) | २४ | २४ | २३ | २३ | २३ |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ८५ | ८० | ७८ | ७५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५० | ४८ | ४९ | ६० | ५६ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| वा-याची दिशा | २३६ | २९१ | २९२ | २७० | २४८ |

| | | |
|---|---|---|
| हवामानाचा इशारा | दिनांक ३० जून ते ४ जुलै पर्यंत जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे, दिनांक ३० जूनला बर्याच ठिकाणी वादळी वार्यासह पाऊस अपेक्षित आहे व दिनांक ०१ जुलैला काही तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. | |
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व पिके | | मागील तीन दिवसात जिल्ह्यात काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस झाला आहे तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला आहे, अश्या परीस्थितीत जिथे पेरणी योग्य पाऊस झाला आहे तिथे सर्व पिकांची पेरणीस सुरवात करावी. तसेच ज्या ठिकाणी पेरणीला योग्य पाऊस झाला नाही तेथे अद्याप पेरणी करू नये. बियाणे खरेदी केले असल्यास किंवा घरचे बियाणे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासावी. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंडेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| सोयाबीन | पेरणी | मागील तीन दिवसात जिल्ह्यात काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस झाला आहे तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस झाला आहे, अश्या परीस्थितीत जिथे पेरणी योग्य पाऊस झाला आहे तिथे सोयाबीनची पेरणीस सुरवात करावी. तसेच ज्या ठिकाणी पेरणीला योग्य पाऊस झाला नाही तेथे अद्याप पेरणी करू नये. सोयाबीन बियाणे खरेदी केले असल्यास किंवा घरचे बियाणे असल्यास बियाण्याची उगवण क्षमता तपासावी. सोयाबीन पेरणीसाठी शिफारसीत वाण जेएस ९३-०५, जेएस ९५-६०, जेएस २०-२९, जेएस २०-३४, एमएयुएस-७१, एमएयुएस-१५८. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंडेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |

| | | |
|---|---|---|
| कपाशी | पेरणी | कपाशी पिकामध्ये जिथे पेरणी योग्य पाऊस झाला आहे तिथे पेरणीस सुरवात करावी. तसेच ज्या ठिकाणी पेरणीला योग्य पाऊस झाला नाही तेथे अद्याप पेरणी करू नये. या वर्षी कपाशी पेरणीसाठी देशी सुधारित वाण एकेए -५, एकेए-७, एकेए -८ साठी बियण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे व त्यासाठी मध्यम भारी जमिनी करिता ६० से.मी × १५ से.मी अंतर ढेवावे व अमेरिकन सुधारित जातीमध्ये एकेएच- ०८१ (६० से. मी × ३० से. मी अंतर ढेवावे, यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे ), एकेएच- ०९-५ (सुवर्णा, शुबरा), पीकेव्ही - रजत, एकेएच - ८८२८ वाण वापरावे व त्यासाठी लागवड अंतर मध्यम भारी जमिनीकरिता ६० से.मी × १५ से.मी अंतर ढेवावे, ६० से.मी × ३० से.मी अंतर ढेवावे अनुक्रमे या प्रमाणे ढेवावे, यासाठी बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १० ते १२ किलो वापरावे. देशी संकरीत जात पीकेव्ही-डीएच-१ व पीकेव्ही सुवर्णा वाणसाठी लागवड अंतर ६० × ४५ से. मी ढेवावे व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण ३.० ते ३.५ किलो वापरावे. |
| तूर | पेरणी | तूर पिकामध्ये जिथे पेरणी योग्य पाऊस झाला आहे तिथे पेरणीस सुरवात करावी. तसेच ज्या ठिकाणी पेरणीला योग्य पाऊस झाला नाही तेथे अद्याप पेरणी करू नये. मौसमी पाऊसाचे पेरणीला योग्य पाऊस झाल्याशिवाय पेरणीची घाई करू नये. तूर पिकाकरीता वाण निवडतांना कमी कालावधीसाठी मध्यम जमिनी करिता (टीएटी -१०, आएसीपीएल ८७, एकेटी-८८११), मध्यम कालावधीसाठी मध्यम ते भारी जमिनीसाठी (बीएसएमआर - ७३६, पिकेवि तारा, बीएसएमआर - ८५३), तसेच अधिक कालावधीसाठी भारी जमिनी करिता (आयसीपीऐल – ८७११९th (आशा) व सी-११) वाणांची निवड करावी व बियाण्याचे हेक्टरी प्रमाण १२ ते १५ किलो वापरावे. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंदेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | मुग व उडीद पिकासाठी पेरणी योग्य ओलावा असेल तिथे पेरणी करावयाची असल्यास ७ जुलै पर्यंत करावी. मुग पेरणीसाठी शिफरास केलेल्या जाती मध्ये पिकेवि- ग्रीन गोल्ड, पिकेवि-मुग ८८०२, पिकेवि - एकेएम-४ आणि उडीद पिकासाठी वाण जसे पिकेवि- उडीद -१५, टीएयु - १, टीएयु - २ व पिडीकेवि ब्लाक गोल्ड (एकेयु -१०-१). पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंदेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| ज्वारी | पेरणी | शिफारसी नुसार ज्वारीची पेरणी साठी लवकर येणारे वाण सीएसएच-३०, मध्यम कालावधीचे वाण सीएसएच-३५, एसपीएच-१६३५, सुधारित जातीमध्ये पीडीकेव्ही कल्याणी, सीएसव्ही-२०, सीएसव्ही-२७, सीएसव्ही-३४ वापरावे. |
| आंतरपीक | पेरणी | शाश्वत पिक पद्धती मध्ये अंतरपिके घेतल्यास पिक उत्पन्नाची जोखीम कमी होऊ शकते त्यासाठी कपाशी + मुग / उडीद (१:१), सोयाबीन + तूर (४:२, ६:२, ५:१), तूर+ मुग / उडीद(२:४), ज्वारी + मुग / उडीद / तूर (३:३), कपाशी + ज्वारी + तूर + ज्वारी (३:१:१:१), कपाशी + सोयाबीन + तूर + सोयाबीन(३:२:२:२), |
| भाजीपाला | पेरणी | मिरची, वांगी, टोमाटेची, पत्तागोबी व फुलगोबी या पिकांची ४ ते ६ आठवडे वयांचे रोपाची शेतात लागवड करावी. भेंडी, वाल, चवळी, कारली, ढेमसे, भोपळा, कोहळे, दोडके, व अद्रक यांची लागवड करावी. निशिगंध या फूल पिकांची लागवड करावी. |
| फळझाडे | लागवड | लागवडीसाठी खोदलेले खड्डे शेणखत ४-५ घमेले + सिंगल सुपर फॉस्फेट १ ते २ किलो + मिथिल पराथीयान भुकटी साधारण १०० ग्राम या मिश्रणाने भरून ठेवावेत. खड्डे भरतांना मध्यभागी मातीचा उंचवटा करावा व मध्यभागी कडी रोवावी. पेरणीला योग्य पाऊस झाल्यावर रोपांची लागवड करावी. |

| | | |
|---|---|---|
| | | आंबिया बहाराची फळे असलेल्या संत्रा झाडांची योग्य ती सर्व काळजी करावी, येत्या दिवसात वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता आहे त्यामुळे फळझाडाचे खोडास १ मीटर उंची पर्यंत बोर्डोपेस्ट लावावी. ( १ किलो मोरचूद -१ किलो कळीचा चुना – १० लिटर पाणी व ५ लिटर गोमुत्र ). |
| पशु / जनावरे | | गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. चिखल होवू देवू नये. वादळी वाऱ्यासह हलका ते मध्यम पाऊस होण्याची शक्यता असल्यामुळे जनावरांना व पक्षांना सुरक्षित ठिकाणी ठेवावे. जनावरांना पशुवैदकांचे सल्ल्या नुसार लसीकरण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.